# प्रेसनोट

दि. ०१/०४/२०२४

सात-बारा उतारा नोंद करण्यासाठी व फेरफार उतारा मंजुर करण्यासाठी मध्यस्थी करणा-या खाजगी इसमावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर. गु.र.नं. १८९/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ६५ वर्षे |
| आरोपीचे नाव व पत्ता | विजय सुदाम नाईकनवरे, रा. नागपुर चाळ, येरवडा, पुणे (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८०,०००/- रुपये |
| पडताळणीमध्ये लाच मागणी रक्कम | ८०,०००/- रुपये (ऐंशी हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | १५/०२/२०२४ व दि. २८/०२/२०२४ |
| गुन्हा दाखल दिनांक | ३१/०३/२०२४ |

थोडक्यात माहिती :-

यातील तक्रारदार यांनी कोलवडी, ता. हवेली, जि. पुणे येथे जमीन खरेदी केली होती. त्या जमीनीची सात-बारा उता-याची नोंद / फेरफार मंजुर करणेसाठी थेऊर येथील मंडल अधिकारी यांचेकरीता खाजगी इसम विजय नाईकनवरे यानी तक्रारदार यांचेकडे ८०,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, खाजगी इसम विजय नाईकनवरे यानी तक्रारदार यांचेकडे थेऊर मंडल अधिकारी यांच्याकरीता ८०,०००/- रुपये (ऐंशी हजार रुपये) ची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने वरील प्रमाणे लाच मागणीची गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner